(42)

**सहकारी संस्थांच्या लेखा परीक्षणासाठी लेखापरीक्षकांची नामतालिका दर २ वर्षांनी तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत...**

(26)

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सगृयो २०१३,स-१४/५५.क्र.प्र/३८९/**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २० जानेवारी, २०१७.

वाचा

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम ८१,
२) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१, नियम ६९,
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १४/०९/२०१३ रोजीचे पत्र,
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, क्रमांक: सगृयो- २०१२/मुमंस १७/प्र.क्र.३६/१४-स, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४,
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक: जा.क्र.सआ/लेप/नामतालिका/जिनापतइसं/३५६/२०१६, दिनांक ०८ मार्च, २०१६.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अंतर्गत नियम ६९ (१) अन्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाची तरतूद आहे. सदरहू अधिनियम व नियम प्रत्यक्षात आस्तित्वात आल्यापासून लेखापरीक्षणासाठीची ही तरतुद अद्यापपावेतो कायम आहे. अधिनियमात सुधारणा होण्यापूर्वी शासकीय अर्थसहाय्य प्राप्त असणाऱ्या संस्थांचे लेखापरीक्षण हे शासकीय लेखापरीक्षकांनी पूर्ण करावे व शासकीय अर्थसहाय्य प्राप्त नसलेल्या सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण नामतालिकेवरील लेखापरीक्षकांकरवी करावे अशी तरतुद होती.

२. सहकार अधिनियमातील कलम ८१ व सहकार नियमातील नियम ६९ अन्वये नामतालिकेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेले घटक मुलत: प्रमाणित लेखापरीक्षक असा होता. यामध्ये सनदी लेखापाल, शासकीय सहकार व लेखा पदविका (GDC&A) अशी अर्हता धारण केलेली व्यक्ती नामतालिकेवर अंतर्भूत करण्याची तरतूद होती. तसेच सदर अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका निबंधक तयार करतील आणि अशी तयार करण्यात आलेली नामतालिका शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्यानंतर त्याची अधिकृतता राहील असा देखील त्यात समावेश करण्यात आला होता. या तरतुदी सर्वसाधारणत: सहकार अधिनियम अस्तित्वात आल्यापासून ते यासंदर्भात सुधारित अधिनियमान्वये पारीत झालेल्या अध्यादेशापर्यंत अंमलबजावणीत होत्या. या अध्यादेशानंतर सुधारित अधिनियमान्वये नामतालिकेमधील अर्हताधारक लेखापरीक्षकांमध्ये सनदी लेखापाल फर्म, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक व शासकीय लेखापरीक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र, सुधारित अधिनियम व नियमान्वये नामतालिकेच्या नुतनीकरणाचा कालावधी किती वर्षाचा असावा ही बाब निश्चित करण्यात आलेली नाही. तथापि, संस्था प्रत्येक

Scanned by CamScanner

वित्तीय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवील अशी तरतुद सुधारित अधिनियमातील कलम ८१ व नियम ६९ मध्ये आहे.

३. तद्नंतर, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या वरील संदर्भाधिन क्रमांक ३ येथील दिनांक १४.९.२०१३ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार या विभागाच्या संदर्भाधिन क्र.४ येथील दिनांक २९.१०.२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ६९ (१) अन्वये सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाची असलेली तरतुद विचारात घेऊन सदर सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षण शुल्काबाबतचे सुधारित दर ठरविणे तसेच अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका तयार करणे इत्यादीच्या अनुषंगाने सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरिक्षकांची नामतालिका दर ३ वर्षांनी प्रसिध्दी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर शासन निर्णयात संस्थेच्या लेखापरीक्षणाबाबत अटी व शर्ती नमुद केल्या आहेत.

४. वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संदर्भाधिन क्र.५ येथील दि. ८.०३.२०१६ च्या पत्रान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील नियम ६९ (१) मध्ये नमूद केलेली नामतालिकेबाबतची तरतूद विचारात घेऊन, तसेच या विभागाच्या दिनांक २९.१०.२०१४ च्या शासन निर्णयानुसार सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची नामतालिका प्रसिध्द करण्यासंदर्भात विहीत करण्यात आलेला ३ वर्षाचा कालावधी विचारात घेता त्यामध्ये सदर नामतालिका प्रसिध्द झाल्यापासून ३ वर्षापर्यंत बदल करता येत नाही. त्याचप्रमाणे सहकारी कायदयात वेळोवेळी झालेले बदल तसेच सदय:स्थितीत सहकारी संस्थांची संख्या ( २.३० लाख ) व त्यातुलनेत नामतालिकेवरील लेखापरीक्षकांची संख्या ( ९,२७६ ) विचारात घेता सर्व सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण विहित वेळेत पूर्ण करुन घेण्यावर मर्यादा येत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे. सबब, या सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण अधिनियमात नमूद केल्यानुसार ते विहित मुदतीत पूर्ण करण्याकरीता सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरिक्षकांची नामतालिका दर २ वर्षांनी प्रसिध्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८१ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अधिन नियम ६९ (१) मध्ये विहित केल्यानुसार तसेच वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांची नामतालिका दर २ वर्षांनी प्रसिध्द करण्याकरीता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

(१) वरील नियमात विनिर्दिष्ट केल्यानुसार यापुढे सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी लेखापरिक्षकांची नामतालिका राज्यस्तरावर दर २ वर्षांनी प्रसिध्द करण्यात येईल.

(२) सदर लेखापरीक्षकांची नामतालिका ही माहे, ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत तयार करुन ती माहे, एप्रिलमध्ये राज्यस्तरावर प्रसिध्द करण्यात येईल.

(३) सदर नामतालिकेचा कार्यकाल पुढील दोन आर्थिक वर्षासाठी लागू राहील.



Scanned by CamScanner

(४) चालू आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षकाची संस्थेने नेमणूक केल्यानंतर व संबंधित लेखापरीक्षकाने त्यास संम्मती प्रदान केल्यानंतर शिवाय परंतुकाचे आदेशाने निबंधकाने लेखापरीक्षकाची नेमणूक केली असल्यास नामतालिकेचे नुतनीकरण होताना संबंधित लेखापरीक्षकाने सदरहू नामतालिकेवर नोंदणीकृत होणे अनिवार्य राहील.

२. वरील तरतुदी हया महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये स्थापन झालेल्या सर्व सहकारी संस्था व अर्हताधारक लेखापरीक्षक यांना लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०१२०१५४०१९७७०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santosh P. Khorgade

Digitally signed by Santosh P. Khorgade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-operation Marketing And Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0546acca372ce2d8edbe5dc7949386daf8955a34dfda38bf6f34ce12b899ea7, cn=Santosh P. Khorgade
Date: 2017.01.20 15:46:56 +05'30'

**( सं.पु.खोरगडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रतः-**

१) महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र मुंबई,
२) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई,
३) महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
४) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
७) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, कोल्हापूर, कोकण,
८) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९) अप्पर निबंधक, सहकारी संस्था (लेखा परीक्षण) महाराष्ट्र राज्य सहकार आयुक्त व निबंधक, यांचे कार्यालय, पुणे.
१०) सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षा), ५ बी.जे.रोड, सहकारी संघ इमारत क्र.१, ३ रा माळा, पुणे-१,
११) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई, नाशिक,पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती,

Scanned by CamScanner

१२) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण), मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर.
१३) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
१४) सर्व जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था,
१५) विशेष लेखापरीक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था, (फिरते पथक ) मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर.
१६) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१, मुंबई कॉन्ट्रॅक्टर बिल्डिंग, २ रा मजला, रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड पिअर, मुंबई-३८.
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ मर्या, हाऊसफिन भवन, प्लॉट नं.सी २१, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, रिझर्व्ह बॅकेच्या मागे, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

<u>प्रत</u>:-

१ ) अपर मुख्य सचिव (पणन ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (सहकार ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) निवडनस्ती (१४-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner